२०१८-१९

१५

दि. १८ / ९ / १८

अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या वतीने २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात PCOD अंतर्गत विद्यार्थीनींसाठी "आहार व आरोग्य" या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यासाठी मा. प्राचार्य डॉ. एस. आर. जाधव यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन दि. १८-९-२०१८ रोजी सकाळी ९:३० वाजता मा. प्राचार्यांच्या कक्षामध्ये संपन्न झाले.

या बैठकीत २५-९-२०१८ रोजी चाळीसगाव शहरातील प्रसिध्द स्त्रीरोगतज्ञ डॉ. सौ. शुभांगी पूर्णपात्रे यांचे व्याख्यान आयोजित करण्याचे सर्वानुमते ठरले. या बैठकीसाठी समितीचे सन्माननीय सदस्य खालील प्रमाणे उपस्थित होते. मा. प्राचार्यांच्या मार्गदर्शनानुसार मल्टीपर्पज हालमध्ये सकाळी ९:०० वाजता कार्यक्रम घेण्याचे ठरले.

प्रा. नीमा गोल्हार — (अंतर्गत तक्रार निवारण समिती प्रमुख)
प्रा.डॉ.उज्वला मगर
प्रा. डॉ. रेखा पाटील
प्रा. डॉ. अनिता नाईक — AGNaik
प्रा. एस. एस. राऊत
डॉ. सौ. रोहिणी देशमुख — Rohini

प्राचार्य
डॉ. एस. आर. जाधव

प्राचार्य
नानासाहेब यशवंतराव नारायणराव चव्हाण
कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय
चाळीसगाव जि. [illegible]

२०१२-१९

MEERA
Page
Date

१२

दि० २० जानेवारी २०१९

'अंतर्गत तक्रार निवारण' समिती अंतर्गत महाविद्यालयात विद्यार्थीनींच्या तक्रारी समस्या सोडविण्यासाठी कोणत्या ना कोणत्या कार्यक्रमाद्वारे सतत प्रयत्न सुरु असतो. म्हणून आई आणि मूलगी या दोघींचे नाते अधिक सशक्त कसे करता येईल. या अनुषंगाने 'माय लेक मेळावा' घेण्याचे मनात होते. त्याप्रमाणे मा. प्राचार्य डॉ. एस. आर. जाधव यांच्या परवानगीने मेळावा घेण्याचे ठरविले. या मेळाव्याचे नियोजन करण्यासाठी मा.प्राचार्यांच्या दालनात दि. २० जाने. २०१९ रोजी सौ समितीतील सर्व मा. सदस्यासह बैठक आयोजित केली.

या बैठकीत महाविद्यालयातील जेष्ठ प्रा. डॉ. अनिता नाईक यांचे विद्यार्थीनी व त्यांच्या मातांपुढे मार्गदर्शनपर व्याख्यान ठेवण्याचे निश्चित झाले. तसेच विद्यार्थीनींशी व त्यांच्या मातांशी संपर्क कसा साधायचा? याविषयीही चर्चा झाली. या बैठकीत ३१ जाने २०१९ या दिवशी सर्वानुमते हा मेळावा घेण्याचे निश्चित झाले.

या मेळाव्यासाठी समितीतील सर्व मा. सदस्यांनी व मा. प्राचार्यसाहेबांनी सर्व प्रकारचे सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. चहापानानंतर बैठक विसर्जित करण्यात आली.

उपस्थित सदस्यांची नांवे व स्वाक्षरी

१) प्रा. नीमा गोल्हार — [signature]
२) प्रा.डॉ. रेखा पाटील — [signature]
३) प्रा.डॉ. उज्ज्वल मगर — [signature]
४) प्रा.डॉ. अनिता नाईक — [signature]
५) ॲड. सौ. रोहिणी देशमुख — Rohini
६) श्री डी. डी. कोठावदे — [signature]

[signature]

प्राचार्य
डॉ. एस. आर. जाधव.

प्राचार्य
नानासाहेब यशवंतराव नारायणराव चव्हाण
कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय

दि० ०५.२.१९.

अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या वतीने महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी कुठल्यातरी वेगळ्या परंतु महत्वपूर्ण विषयावर कार्यक्रम घेण्याचे मनात होते. तेव्हा लक्षात आले की मुलींना त्यांचे पालक, शिक्षक, समाज बऱ्याच वेळा समजून घेत नाही. शिक्षण घेत असतांना अनेक संकटांशी सामना करत प्रसंगांना त्यांना तोंड द्यावे लागते. त्यावेळी तिने केलेली तक्रार, व्यक्त केलेली समस्या कोणी समजून घेत नाही. त्यामुळे तिला औदासिन्य येवून व्यक्तिमत्वाच्या विकासात अडथळा येतो. म्हणून ही बाब लक्षात येताच "चला तिला समजून घेऊ या" या विषयावर stepup अंतर्गत कमलेश म्हैसकाळे यांचे मार्गदर्शन घ्यायचे मनात आले. मा. प्राचार्य साहेबांशी सविस्तर चर्चा करून लगेचच लेडीज स्टाफ रूम मध्ये दि. ५-२-१९ रोजी समितीच्या सदस्यांची बैठक आमंत्रित केली. सांगोपांग चर्चा करून कार्यक्रमाचे नियोजन करून दि. १२/२/२०१९ रोजी सकाळी ९:०० वाजता मल्टीपर्पज हॉल मध्ये या कार्यक्रमाचे सादरीकरण करण्याचे ठरले.

या वेळी मा. प्राचार्यांचे सहकार्य लाभून सर्व सदस्यांनी सर्वतोपरी सहाय्य करण्याचे आश्वासन दिले.

सर्व समिती सदस्यांची सही व नाव

1) प्रा. नीमा गोल्हार [signature]
2) प्रा डॉ. रेखा पाटील [signature]
3) प्रा. डॉ. उज्ज्वल मगर [signature]
~~४) प्रि. व्ही. व्ही. मराठे~~ –
४) ॲड. सौ. रोहिणी देशमुख – Rohini
५) प्रा. डॉ. टी. कोगदे [signature]

[signature]

प्राचार्य
डॉ. व्ही. आर. जाधव

प्राचार्य
नानासाहेब यशवंतराव नारायणराव चव्हाण
कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय
चाळीसगांव जि. जळगांव

2019-20

MEERA Page Date

सभा -

दि० १० जुलै २०१९

अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या वतीने महाविद्यालयातील विद्यार्थी - विद्यार्थिनींनी साठी स्त्री-पुरुष समानता, स्त्री आरोग्य - मानसिक शारिरिक तसेच विद्यार्थीनींच्या संपूर्ण व्यक्तीमत्व विकासासाठी वेगवेगळे कार्यक्रम आयोजित केले जातात. तसेच विद्यार्थिनींच्या सर्व समस्या सोडविल्या जातात. या अनुषंगाने घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमांसंदर्भात चर्चा या सभेत करण्यात आली.

या वर्षी देखिल वेगवेगळ्या विषयांवर व्याख्यान तसेच मेळा - पालक मेळावा आयोजित करण्याचे ठरले. पुढील महिन्यात मासिक मेमीळ सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या मा. डॉ. सौ. कविता बोंडे, धुळ्याचे प्रसिद्ध कथाकार, लेखक डॉ. संजीव गिरासे यांचे व्याख्यान व प्रबोधनपर कथाकथनाचा कार्यक्रम आयोजित करावयाचा असा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला.

तसेच सर्व समितीतील सदस्यांनी विद्यार्थिनींना वैयक्तिक पातळीवर मार्गदर्शन करुन त्यांचे आत्मबळ वाढावे यासाठी प्रयत्न करावे, असाही निर्णय घेण्यात आला. या सभेस खालील प्रमाणे सदस्य उपस्थित होते. मा. प्राचार्य डॉ. एस. आर. जाधव यांनी देखिल महत्वपूर्ण मार्गदर्शन केले व सभा विसर्जित करण्यात आली.

सर्व समिती सदस्यांची नांवे व सही

१) प्रा० निमा गोल्हार (सही)
२) प्रा. डॉ. रेखा पाटील (सही)
३) प्रा. डॉ. उज्वल मगर (सही)
४) डॉ. सौ. रोहिणी देशमुख Rohini
५) श्री. डी. डी. कोठावदे (सही)

(सही)

डॉ. एस. आर. जाधव.

प्राचार्य
नानासाहेब यशवंतराव नारायणराव चव्हाण
कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय
चाळीसगांव, जि. जळगांव

2019-20

MEERA
Page
Date

दि. २४ सप्टेंबर १९

दि. १० जुलै १९ रोजी सभेत ठरल्याप्रमाणे मा. सौ. कविता कौंडे, नाशिक यांचे 'मुलींची सामाजिक आणि वैयक्तिक अभिव्यक्ती' या विषयावर दि. २६ सप्टेंबर रोजी व्याख्यान आयोजित करण्याचे ठरवले. यासंदर्भात त्यांच्याशी भ्रमणध्वनीवर संभाषण करण्यात आले. व व्याख्यान घेण्याचे नियोजित करण्यात आले. या कार्यक्रमाच्या नियोजनासाठी मा. प्राचार्य डॉ. एम. आर. जाधव यांच्या अध्यक्षतेत आज समिती सदस्यांची सभा आयोजित करण्यात आली होती.

व्याख्यानासाठी विद्यार्थिनींना सर्वांनी सूचित करावे, बहुउद्देशीय सभागृहात मुलींची बैठक व्यवस्था, व्यासपीठ, स्वागत कार्यक्रमासाठी लागणारे सर्व साहित्य जमवावे, या सर्व कामांची जबाबदारी सर्व समिती सदस्यांवर सोपवण्यात आली.

तसेच या शैक्षणिक वर्षात द्वितीय सत्रात धुळे येथील मा. प्रा. डॉ. संजीव गिरासे यांचे 'स्त्री पुरुष समानता' या विषयावर व 'मातापालक मेळावा' घ्यायचा असे सर्वानुमते ठरविण्यात आले. सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

समिती सदस्यांची नावे व सह्या.

१) प्रा. सौ. तिमा गोलहार [signature]
२) प्रा. डॉ. सौ. रेखा पाटील [signature]
३) प्रा. डॉ. कु. उज्वला मगर [signature]
४) श्री. डी. टी. कोठावदे [signature]
५) ॲड. सौ. रोहिणी देशमुख. Rohini

[signature]
डॉ. एम. आर. जाधव.
प्राचार्य
नानासाहेब यशवंतराव नारायणराव चव्हाण
कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय
चाळीसगांव, जि. जळगांव

२०२०-२१

MEERA
Page
Date

दि० ०८ जुलै २०२०

मा० प्राचार्य डॉ. एस्. आर. जाधव यांच्या अध्यक्षतेखाली दि० ०८ जुलै २०२० रोजी स० ११ वाजता 'अंतर्गत तक्रार निवारण समितीची' सभा प्राचार्य दालनात आयोजित करण्यात आली. सभेत समितीतील सदस्य हजर होते.

सभेत विद्यार्थिनींच्या आरोग्यासाठी तसेच संरक्षणासाठी ~~काम~~ महाविद्यालयातर्फे काय करता येईल या विषयावर चर्चा करण्यात आली. या अनुषंगाने त्यांच्यासाठी ~~[illegible]~~ आरोग्य उत्तम रहावे, म्हणून आहार, स्वच्छता या विषयावर व्याख्यान आयोजित करण्याचे ठरले. या शैक्षणिक वर्षात तज्ञ व्यक्तींचे व्याख्यान आयोजित करावयाचे असे ठरले.

या काळात कोरोना या आजाराने जास्त कहर केला होता, सर्वांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे म्हणून आरोग्यावर जास्त लक्ष केंद्रित करावे म्हणून यासंबंधी विद्यार्थिनींना प्रबोधन करावे, असे ठरले. सर्वांनी स्वतःची काळजी घेऊन, योग्य अंतरावर बसून ~~सभेत~~ सभेत सहभाग घेतला.

प्रा. सौ. ए. एस. कुलकर्णी
प्रा. डॉ. सौ. आर. डी. पाटील
प्रा. डॉ. सौ. यु. डी. नन्नवरे  Pnannaware
प्रा. एस्. के. मोरे  Skmore
श्री. ए. बी. सुर्यवंशी

2020-21

दि० ७ डिसेंबर २०२०

दि० ७ डिसेंबर २०२० रोजी 'अंतर्गत तक्रार निवारण समिती'-ची सभा कोरोना काळ सुरु असल्यामुळे conference call च्या माध्यमातून घेण्यात आली. मुलींना स्वतःची तसेच कुटुंबाची काळजी या दरम्यान कशी घ्यावयाची यासंदर्भात विद्यार्थिनींनी काय केले पाहिजे, याची चर्चा करण्यात आली. प्रत्यक्षात भेट होऊ शकत नाही म्हणून वेगवेगळ्या संस्थेतर्फे आरोग्यविषयक तसेच शैक्षणिक विषयावर online कार्यशाळा, आयोजन परिषद आयोजित करण्यात येत होत्या, यासंदर्भात विद्यार्थिनींना सर्व सभासदांनी माहिती द्यावी, तसेच त्यांना येणाऱ्या समस्यांचे निराकरण करावे, असे ठरले.

'महिला आरोग्य प्रबोधन' संदर्भात आयुर्वेद, योगा आणि आहार या संदर्भातील online कार्यक्रम कोणकोणते आहेत, ते विद्यार्थिनींना सर्वांना वेळोवेळी सांगावेत. विद्यार्थिनी - विद्यार्थी यांना whatsapp ग्रुपवर ही माहिती द्यावी, या संदर्भात चर्चा करण्यात आली.

प्रा. ए. एल. कुलकर्णी [signature]
प्रा. डॉ. सौ. आर. व्ही. पाटील [signature]
प्रा. सौ. डॉ. यु. पी. नन्नावरे Unannaware
प्रा. एस. के. मोरे S.more
श्री. ए. बी. सुर्यवंशी

2021-22

MEERA Page Date

दि० ५ मार्च २०२२

दि० ०५ मार्च २०२२ रोजी स० १० वाजता मा० प्राचार्य डॉ. एस्. आर. जाधव यांच्या अध्यक्षतेत 'अंतर्गत तक्रार निवारण' समितीची सभा प्राचार्य दालनात घेण्यात आली. सभेस खाली सही करणारे सदस्य हजर होते. मागील सभेत ठरल्याप्रमाणे दि० ०८ मार्च २०२१ रोजी 'महिला दिन' निमित्ताने शिक्षणशास्त्र विभागातील प्रा० मंगला सूर्यवंशी यांचे online 'महिला सबलीकरण' या विषयांवर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

आजची सभा ही दि० १५ मार्च २०२२ रोजी ICC आणि 'युवती सभा' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमाच्या नियोजनासाठी घेण्यात आली. यादिवशी 'मानसिक आरोग्य' या विषयांवर मा० डॉ. पामल पवार आणि 'महिलांसाठी असणारे कायदे' या विषयांवर मा० ॲड. माधुरी टक्के यांचे व्याख्यान आयोजित करण्याचे ठरले. सभेत कार्यक्रम उत्तम रितीने कसा करता येईल यांवर चर्चा करण्यात आली. सभेस युवतीसभा प्रमुख प्रा० पर्वती पाडवी व इतर सदस्य ही हजर होते.

सभेत युवती सभे अंतर्गत दि० २२ मार्च ते ३० मार्च २०२२ दरम्यान घेण्यात येणाऱ्या 'स्वयंसिद्धा अभियान' च्या नियोजना संदर्भात चर्चा करण्यात आली.

दि० १६ डिसे० २१ रोजी प्रा० डॉ. मु. आर. मगर व प्रा० एस्. के. मोरे यांनी केलेल्या तक्रार अर्जावर या सभेत चर्चा करण्यात आली.

प्रा. सौ. ए. एल. कुलकर्णी [signature]
प्रा. पी. एस्. पाडवी.
प्रा. डॉ. मु. आर. मगर [signature]
प्रा. सौ. डॉ. कु. पी. ए. नावेर Pnamavare
प्रा. एस्. के. मोरे. SKmore
श्री. ए. बी. सूर्यवंशी

2021-22

MEERA
Page
Date

दि. ०७ एप्रिल २०२२

दि. ७ एप्रिल २०२२ रोजी 'अंतर्गत तक्रार निवारण' समिती आणि 'युवती सभा' यांची संयुक्त सभा मा. प्राचार्य डॉ. एस. आर. जाधव यांच्या अध्यक्षतेत स. ११ वाजता संपन्न झाली. सुरुवातीला दि. १५ मार्च २०२२ रोजी व्याख्यानांचा जो कार्यक्रम आला तो अतिशय नियोजनबद्ध संपन्न झाला, म्हणून मा. प्राचार्यांनी सर्वांचे कौतुक केले.

विद्यार्थिनींच्या संरक्षणासाठी तसेच आरोग्यासाठी व्याख्यान आयोजित करण्यात आले होतेच. यानंतर 'युवती सभा' अंतर्गत दि. ८ एप्रिल २०२२ रोजी विद्यार्थिनींसाठी 'व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळा' (एकदिवसीय) आयोजित करण्याचे निश्चित झाले. या एकदिवसीय कार्यशाळेत आरोग्य, कायदे, व्यक्तिमत्त्व व रोजगार या विषयांवर व्याख्यानांचे आयोजन करण्यात येणार होते. या अनुषंगाने या एकदिवसीय कार्यशाळेचे नियोजन करण्यात आले.

प्रा. सौ. ए. एल. कुलकर्णी [signature]
प्रा. डॉ. आर. व्ही. पाटील [signature]
प्रा. डॉ. सौ. यु. पी. नन्वरे [signature]
प्रा. एस. के. मोरे. [signature]
मिस. ए. बी. सुर्यवंशी
प्रा. पी. एस. जाडरी
प्रा. डॉ. यु. आर. मगर [signature]

2022-23

MEERA
Page
Date

08 सप्टेंबर 2022

2022-23 या शैक्षणिक वर्षात कार्यक्रमांच्या नियोजनासंदर्भात दि. 08 सप्टेंबर 2022 रोजी सर्व समिती सदस्यांची सभा मा. प्राचार्य डॉ. एस्. आर. जाधव यांच्या उपस्थितीत संपन्न झाली. आपल्या महाविद्यालयात मुलींची संख्या जास्त असते, आणि सध्याचे युग हे Internet मय झाले आहे. सर्वच social media चा वापर करतात, म्हणून cyber security, cyber crime म्हणजेच online माध्यमा-तून खूप जणांना त्रास होतो, यासंदर्भात विद्यार्थिनींना माहिती, मार्गदर्शन मिळावे. तसेच महिलांच्या सुरक्षे-संदर्भात मार्गदर्शन मिळावे म्हणून व्याख्यान आयोजित करावयाचे असा निर्णय घेण्यात आला.

तसेच विद्यार्थीनी जवळपासच्या खेड्यावरून ये-जा करतात. त्यांना बऱ्याच समस्यांना सामोरे जावे लागते. यासंदर्भात मुली जर काही समस्या घेऊन आल्या तर सर्व समिती सदस्यांनी त्यांना समस्या सोडविण्यासाठी मार्गदर्शन केले पाहिजे, यावर चर्चा करण्यात आली.

दि. १४ ऑगस्ट 22 रोजी विद्यार्थ्यांचा अर्ज आला होता, त्यांना सकाळी जिमचा वापर हवा होता. यासंदर्भात चर्चा करून जिमच्या चाविची व्यवस्था करून विद्यार्थिनींची सोय करून देण्यात आली.

प्रा. सौ. अनुराधा कुलकर्णी [signature]
प्रा. डॉ. सौ. रेखा पाटील [signature]
प्रा. डॉ. सौ. उज्वला तळवरे [signature]
प्रा. सुवर्णा मोरे [signature]
अॅड. एन. बी. सूर्यवंशी

2022-23

दि. २५ नोव्हेंबर २०२२

दि. २५ नोव्हेंबर रोजी 'अंतर्गत तक्रार निवारण' समिती आणि 'युवती सभा' यांची संयुक्त सभा मा. प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. मागच्या सभेत ठरल्याप्रमाणे व्याख्यान दि. २६ नोव्हें. २२ रोजी म्हणजे उद्या घेणार येणार आहेत. दि. २६ नोव्हें २२ रोजी 'संविधान दिन' या विषयावर मा. ॲड. न्यायाधिश श्री. वाळके साहेब 'Cyber crime : Women's safety and Security' या विषयावर मा. श्री. पी. आर. एकळे PI, चाळीसगाव आणि 'महिलांसाठी कायदे' या विषयावर मा. ॲड. माधुरी एडके या मान्यवरांचे व्याख्यान 'अंतर्गत तक्रार निवारण समिती आणि युवती सभा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येणार आहेत. या कार्यक्रमाचे नियोजन या सभेत करण्यात आले.

सर्व सदस्यांना यांनी सोपविण्यात आलेली जबाबदारी उत्तम रितीने पूर्ण करू, अशी ग्वाही मा. प्राचार्य महोदयांना दिली. तसेच महाविद्यालयाच्या गेटसमोर रस्त्यात कुठलेही वाहन, पिण्याच्या पाण्याची सोय आणि वर्गात स्वच्छता करण्यासंदर्भात तक्रार होत्या. त्यानुसार मा. प्राचार्यांनी योग्य ती कार्यवाही केली होती. सर्व समस्यांचे निराकरण झाले होते. यासंदर्भात चर्चा करण्यात आली.

प्रा. सौ. ए. एड. कुलकर्णी (signature)
प्रा. डॉ. सौ. आर. व्ही. पाटील (signature)
प्रा. डॉ. सौ. यु. वी. तनवर Tanwar (signature)
प्रा. एस. के. मोरे. Skmore (signature)
श्री. ए. बी. सुर्यवंशी.
प्रा. पी. एस. पाडवी.
प्रा. डॉ. यु. आर. मगर (signature)

2022-23

दि० 8.03.2023

दि. ८ मार्च २०२३ रोजी सं. ५ वाजता मा. प्राचार्य डॉ. एस. आर. जाधव यांनी सर्व महिला प्राध्यापकांचा सत्कार आयोजित केला होता. सर्व महिला प्राध्यापकांचे यावेळी स्वागत करण्यात आले. 'अंतर्गत तक्रार निवारण समिती' अंतर्गत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. वेगवेगळ्या क्षेत्रात महिलांचा कसा असामान्य सहभाग आहे, याविषयी मा. प्राचार्य डॉ. एस. आर. जाधव यांनी माहिती सांगितली. यावेळी महाविद्यालयाचे मा. उपप्राचार्य डॉ. डी. डी. देशमुख हे देखील उपस्थित होते. सर्व उपस्थितांचे आभार समिती प्रमुख प्रा. सौ. ए. एल. कुलकर्णी यांनी मानले.

२०२३-२४ या शैक्षणिक वर्षात देखील विद्यार्थिनींसाठी या वर्षाप्रमाणे व्याख्यान, विविध उपक्रम आयोजित करावे, असे मा. प्राचार्यांनी सर्वांना आवाहन केले. सर्व समिती सदस्यांनी विद्यार्थिनींना कोणत्या समस्या आहेत यावर त्यांना असे मार्गदर्शन करावे, या संदर्भात चर्चा केली. सभेस खालील सदस्य हजर होते. विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार पिण्याच्या पाण्याची आणि वर्गातील स्वच्छतेसंदर्भात मा. प्राचार्यांनी योग्य ती कार्यवाही केलेली होती.

- प्रा. सौ. ए. एल. कुलकर्णी
- प्रा. डॉ. आर. व्ही. पाटील
- प्रा. डॉ. सौ. यु. बी. नन्नवरे — Unnavare
- प्रा. एस. के. मोरे — SKmore
- श्री. ए. बी. सूर्यवंशी
- डॉ. डी. डी. देशमुख